**M.I.D.C Police Station, Jalgaon,**
**Dist.Jalgaon, Maharashtra**
**एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता.जि.जळगांव महाराष्ट्र**
**Ph. No.02557- 2210500.**
**Email ID- pstn.midc@gmail.com.**

दिनांक.१५/१२/२०२५

-- प्रेस नोट --

प्रति,

मा. संपादक

-----------------------------

विषय - मोटार सायकलच्या डिक्कीमधून रोख रक्कमेची चोरीचा गुन्हा एमआयडीसी पोस्टे कडून उघड, चोरी करणारे त्रिकुट मुद्देमालासह जेरबंद

----ooo----

जळगाव शहरातील रामेश्वर कॉलनी परिसरात राहणारे फिर्यादी यांनी दि.१०/१२/२०२५ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास त्यांच्या मालकीच्या संतोषी माता चौक जळगाव परिसरातील समर्थ कृपा प्रोव्हीजन बंद करुन दिवसभरात जमा झालेली रोख रकमेचा ८३,०००/-रुपयेचा गल्ला प्लॅस्टीकच्या थैली मध्ये टेवुन त्याच्या मालकीच्या अॅक्टीवा मोपेड गाडीच्या डिक्कीत ठेवला होता. फिर्यादी हे शेरा चौकातील भुमी हॉटेल जवळील मेडीकल समोर वाहन लावुन मेडीकल मध्ये औषधी घेणेकामी गेले होते. परत येवुन अॅक्टीवा मोटार सायकल घेवुन घरी पोहचलेवर सदर वाहनाची डिक्की उघडून बघता डिक्कीत ठेवलेली पैसे न दिसल्याने परिसरात शोध घेता पैसे मिळुन न आल्यान वाहनाच्या डिक्कीतुन ८३,०००/-रुपये रोख रक्कमेची चोरी झाले बाबत खात्री झाल्याने एमआयडीसी पोलीस स्टेशनला सिसिटीएनएस क्रं. ९०२/२०२५ भारतिय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**गुप्त बातमिदारांकडून गोपनिय बातमी काढून व सिसिटीव्ही फुटेजचे बारिकाईने विश्लेषण करुन सदर गुन्हा करणा-या आरोपीतांची ओळख पटवुन सदर आरोपीतांची माहिती काढून सदर गुन्हा करणारे आरोपीतास जळगाव शहरातील दत्त नगर भागात सापळा रचुन शिताफीने दि.१२/१२/२०२५ रोजी ताब्यात घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस करता त्यांने त्यांचे नाव १) रुषीकेश अजय तेली, २) रोहित गुरुदयाल बघेल, ३) अनुज ईश्वर सोनवणे सर्व रा. दत्त नगर, मेहरुण जळगाव अशंनी मिळुन सदरचा गुन्हा केलेची कबुली कबुली देवुन त्याने सदरच्या गुन्ह्यात चोरी केलेले रक्कम रोख रु.८३०००/- काढून दिल्याने सदरची रक्कम जप्त करुन सदर तिन्ही आरोपीतांना गुन्ह्याकामी अटक करण्यात आली आहे.**

सदरची कामगिरी एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव चे पोनि बबन आव्हाड यांनी आवश्यक सुचना देवुन एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे पोउनि राहुल तायडे, पोउनि चंद्रकांत धनके, सफौ विजयसिंग पाटील, पोह गणेश शिरसाळे, पोह प्रमोद लाडवंजारी, पोकॉ नितीन ठाकुर, पोकॉ किरण पाटील, पोकॉ गणेश ठाकरे, पोकॉ राहुल घेटे, पोकॉ नरेंद्र मोरे अशांनी केली आहे.

सदरची कारवाई डॉ.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

**पोलीस निरीक्षक**
**एमआयडीसी पो.स्टे.जळगाव**


एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163